# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(क्रिडा व शारिरिक शिक्षण विभाग)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५


जावक क्रमांक/गो.वि.ग./ ५११ /२०२२ दिनांक : ०९/१२/२०२२

प्रति,

- ✓ मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये
- ✓ मा. सर्व विभाग प्रमुख, प्रशासकीय / शैक्षणिक विभाग
  गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- अमृत क्रीडा व कला महोत्सव २०२३ करीता नोंदणी करण्याबाबत..**

संदर्भ :- मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेची टिपणी ३७२/२०२२, दि. १०/११/२०२२

मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेनुसार गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीशी संलग्नित विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचा-यांकरीता तिन दिवसीय **अमृत क्रिडा व कला महोत्सवाचे आयोजन** **दि. २७ ते २९ जानेवारी, २०२३** या कालावधीत करण्यात येत आहे.

शिक्षकेत्तर कर्मचा-यांमधील कलागुणांना वाव मिळून त्यांच्यामध्ये खेळांप्रती उत्साह निर्माण व्हावा याकरीता आयोजीत क्रीडा व कला प्रकारामध्ये बहुसंख्य कर्मचारी सहभागी होतील याकरीता गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्यांनी आपल्या अधिनस्त शिक्षकेत्तर कर्मचा-यांना उक्त कालावधीकरीता कर्तव्य रजा मंजुर करावी. तसेच कर्मचा-यांना सरावाकरीता मैदान, आवश्यक खेळांचे साहित्य उपलब्ध करून द्यावे व कर्मचा-यांना खेळात सहभागी होण्याकरीता प्रोत्साहीत करावे.

अमृत क्रीडा व कला महोत्सवाकरीता खालीलप्रमाणे क्रीडा व कला प्रकार नियोजीत असून सहभाग घेवू ईच्छिणा-या नियमीत कर्मचा-यांची यादी महाविद्यालयांच्या लेटरहेडवर प्राचार्यांच्या स्वाक्षरीने तसेच विद्यापीठीय शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी व्यक्तीशः लेखी स्वरूपात/संघ निहाय दिनांक २५/१२/२०२२ पर्यंत क्रीडा व शा. शिक्षण विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचेकडे टपाल/ई-मेल व्दारे नोंदणी करावी.

**१) क्रीडा प्रकार –**

**(१)** क्रिकेट (पु.) **(२)** व्हॉलिबॉल (पु.) **(३)** दौडस्पर्धा २ किमी (पु. व म.) **(४)** खो-खो (पु. व म.) **(५)** रस्साखेच (पु. व म.) **(६)** कबड्डी (पु.) **(७)** संगीत खुर्ची (म.)

**२) कला प्रकार (सांस्कृतीक कार्यक्रम) (पु. व म.) –**

(१) समुह व एकल गितगायण (२) समुह व एकल नृत्य (३) लघु नाटीका

टिप - १) सांघीक खेळांकरीता केवळ संघनिहाय नोंदणी स्विकारण्यात येतील. कर्मचारी सांघीक खेळांमध्ये सहभाग घेण्यास ईच्छुक आहेत परंतु महाविद्यालयातील कर्मचा-यांची संख्या संघ तयार करण्यास अपूरी पडत असेल अशा परिस्थितीत महाविद्यालयांतील कर्मचारी यांनी त्यांचे स्तरावरून इतर महाविद्यालयातील कर्मचा-यांशी संपर्क साधून संघ तयार करुन संघनिहाय नोंदणी करावी.

२) संघाकरीता आवश्यक खेळाडू संख्येपेक्षा अधिक नोंदणी झाल्यास नियमाप्रमाणे निवड चाचणी (Selection Trial) घेवून उत्तम खेळाडू / कर्मचारी यांना संघामध्ये खेळण्याची संधी दिल्या जाईल.

**डॉ. अनिता लोखंडे**
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव -**

१) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली